(223)

# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी – १८,
## वैद्यकीय विभाग
### सभावृत्तांत

दिनांक – १२/०६/२०१७

धन्वंतरी स्वास्थ्य योजना धोरण २०१३ नुसार समितीचे सदस्यांची विमा प्रतिनिधींसमवेत चर्चा करणेकामी आढावा बैठक दि.१२/०६/२०१७ रोजी दु.१.०० वाजता बैठक आयोजित करण्यात आलेली होती. सदर बैठकीकरिता खालील अधिकारी उपस्थित होते.

१. श्री. श्रावण हर्डीकर, आयुक्त तथा अध्यक्ष
२. श्री. अच्युत हांगे, अति.आयुक्त तथा उपाध्यक्ष
३. श्री. बबनराव झिंझुर्डे, अध्यक्ष, कर्मचारी महासंघ तथा उपाध्यक्ष
४. डॉ. के अनिल रॉय, आरोग्य वैद्यकीय अधिकारी तथा कार्याध्यक्ष
५. श्री. राजेश लांडे, मुख्यलेखापाल तथा सदस्य
६. श्रीमती पद्मश्री तळदेकर, मुख्यलेखापरिक्षक तथा सदस्य
७. ॲड. सतिश पवार, प्र. कायदा सल्लागार तथा सदस्य
८. डॉ. पवन साळवे, अति.आरोग्य वैद्यकीय अधिकारी
९. डॉ. मनोज देशमुख, वैद्यकीय अधिक्षक तथा सदस्य
१०. श्री. राजेश आगळे, प्रशासन अधिकारी (सहा.आयुक्त प्रशासन यांचे प्रतिनिधी)
११. श्री. मनोज माछरे, सहखजीनदार, कर्मचारी महासंघ तथा सदस्य
१२. श्री. मधुकर रणपिसे, सहखजीनदार, कर्मचारी महासंघ तथा सदस्य
१३. श्रीमती रेखा गाडेकर, प्रशासन अधिकारी (महिला) तथा सदस्य
१४. विविध विमा संस्थांचे प्रतिनिधी

धन्वंतरी स्वास्थ्य योजनेमध्ये होणारा खर्च लक्षात घेता त्याऐवजी महानगरपालिकेच्या कर्मचा-यांकरिता आरोग्य विमा उतरविणेकरिता विमा संस्थेच्या प्रतिनिधींसमवेत चर्चा करणेकामी बैठक आयोजित करण्यात आलेली होती. धन्वंतरी योजनेसंदर्भात मा.आयुक्त सो. व मा.अति.आयुक्त सो. यांना आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांचेमार्फत सविस्तर माहिती देण्यात आली. तसेच, धन्वंतरी स्वास्थ्य योजनेऐवजी कर्मचा-यांचा आरोग्य विमा उतरविणेबाबत मागील धन्वंतरी समिती योजना बैठकीमध्ये झालेल्या निर्णयाप्रमाणे तसेच मा.आमदार यांनी दिलेल्या सूचनेनुसार चर्चा करणेकामी विमा संस्थेच्या प्रतिनिधींना आमंत्रित करण्यात आल्याचेही आरोग्य

वैद्यकीय अधिकारी यांनी नमूद केले. त्यानुसार सदर बैठकीमध्ये खालीलप्रमाणे चर्चा करण्यात आलेली आहे.

१. वैद्यकीय विभागामार्फत विमा कंपनीच्या प्रतिनिधींना एकूण कर्मचा-यांची संख्या, आजारांची यादी तसेच धन्वंतरी योजना धोरणाची प्रत उपलब्ध करुन देण्यात आली असता त्यांचेमार्फत अंदाजित विमा रक्कम कळविण्यात आलेली आहे. त्यानुसार महानगरपालिकेच्या कर्मचा-यांचा गट विमा (Group Insurance) उतरविणेकरिता अंदाजे ८ ते १० कोटी इतका खर्च नमूद करण्यात आलेला आहे.

२. सद्यस्थितीत धन्वंतरी योजनेमध्ये प्रत्येक कर्मचा-यांस २० लाख रकमेमपर्यंत खर्चाची मर्यादा निश्चित करण्यात आलेली आहे व विमा कंपन्यांकडून र.रु.१० लाखांचे संरक्षण असलेली आरोग्य विमा हस्यापोटी रक्कम कळविण्यात आल्याचे आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी नमूद केले. मा.अति.आयुक्त यांनी विमा कंपन्यांमार्फत सर्वप्रथम कोणत्या रुग्णालयांमध्ये उपचार पुरविण्यात येतील याची निश्चिती करणेबाबत सूचना केली. तसेच संपूर्ण आरोग्य विमा योजनेमध्ये कॅशलेस उपचार पुरविण्यात येतील याचीही दक्षता घेण्यात यावी असेही त्यांनी नमूद केले.

३. डॉ.मनोज देशमुख, वैद्यकीय अधिक्षक यांनी बाह्यरुग्ण विभागामधून Lab Investigation करिता संदर्भित करण्यात येणा-या रुग्णांना देखील आरोग्य विमा देण्यात येईल किंवा कसे? याबाबत विचारणा केली असता विमा प्रतिनिधींमार्फत त्यास नकार दिला. तथापि, सदर रुग्णांवर जर Lab Investigation नंतर शस्त्रक्रिया करण्यात आल्यास शस्त्रक्रिया पूर्वी ३० दिवस व शस्त्रक्रियानंतर ६० दिवसांमधे होणारे सर्व उपचारांची प्रतिपूर्ती करण्यात येईल असे नमूद केले. त्याचबरोबर आरोग्य विमा योजनेमध्ये बाह्यरुग्ण विभागातील उपचारांचा देखील समावेश करुन आरोग्य विमा उतरविता येईल असेही त्यांनी नमूद केले.

४. अति.आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी ALD, HIV चे रुग्णांना विमा संरक्षण देण्यात येईल किंवा कसे? याबाबत प्रश्न उपस्थित केला असता विमा प्रतिनिधींनी त्यांना विमा योजनेअंतर्गत

उपचार पुरविण्यात येणार नसल्याचे निदर्शनास आणून दिले. तसेच राष्ट्रीय कार्यक्रमांतर्गत असलेले प्रसुती, मोतीबिंदू यांचाही समावेश त्यामध्ये नसल्याचे नमूद केले.

५. श्री.बबन झिंझुर्डे अध्यक्ष, कर्मचारी महासंघ यांनी यापूर्वीच्या वैद्यकीय प्रतिपूर्ती धोरणानुसार झालेला खर्च व धन्वंतरी स्वास्थ्य योजनेमध्ये होणारा खर्च यामध्ये असलेली तफावत ही उपचार घेणा-या रुग्णांचे संख्येमध्ये वाढ झाल्यामुळे असल्याचे नमूद केले. तसेच पूर्वीच्या योजनेमध्ये सेवानिवृत्त कर्मचा-यांना कोणतेही वैद्यकीय उपचार पुरविण्यात येत नव्हते ते धन्वंतरी योजनेमध्ये पुरविण्यात येत असल्याचे सांगितले. तसेच सेवेतील कर्मचा-यांकडून दरमहा वर्गणी म्हणून र.रु. ३०० व व सेवानिवृत्त कर्मचा-यांचे निवृत्ती वेतनामधून दरमहा र.रु. १५०/- कपात करण्यात येत असून योजनेमध्ये महापालिका व कर्मचारी यांचाही हिस्सा असल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच यामध्ये ६०% कर्मचारी हे वर्ग ४ चे कर्मचारी असून त्यामध्ये आरोग्यविषयक साफसफाईचे कामकाज करणा-या कर्मचा-यांची संख्या अधिक आहे. त्यामुळे अशा कर्मचा-यांना वैद्यकीय सेवा पुरविणे आवश्यक आहे. मागील बैठकीमध्ये निश्चित करण्यात आल्यानुसार तातडीक नसलेल्या रुग्णांना रेफर चिट घेण्याचे बंधनकारक करण्यात आल्यामुळे देखील किरकोळ आजारांकरिता रुग्णालयामध्ये दाखल होऊन उपचार घेणा-यांची संख्या कमी झाल्याचेही त्यांनी निदर्शनास आणून दिले. तसेच खाजगी रुग्णालये ही योजनेचा गैरफायदा घेण्याचे उद्देशाने कर्मचा-यांना घाबरवून त्यांना ॲडमिट होण्यास प्रवृत्त करतात त्यामुळे अशा रुग्णालयांवर देखील कारवाई करण्यात यावी अशी त्यांनी मा.आयुक्त सो. यांना विनंती केली. तसेच धन्वंतरी कक्षामध्ये अतिरिक्त वैद्यकीय अधिकारी बिलांचे तपासणीकामी व खाजगी रुग्णालयांवर नियंत्रण ठेवणेकामी नियुक्त करण्याची मागणी केली. त्यास आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी याकामी वैद्यकीय अधिकारी उपलब्ध नसल्याचे निदर्शनास आणून दिले.

६. मा.आयुक्त सो. यांनी विमा संस्थेच्या प्रतिनिधींना गटविमा उतरविणेकरिता कर्मचा-यांचे आरोग्य तपासणी करणे आवश्यक आहे किंवा कसे? याबाबत विचारणा केली असता गट विमा उतरविणेकरिता कर्मचा-यांची आरोग्य तपासणी करणे आवश्यक नसल्याचे विमा

प्रतिनिधींमार्फत कळविण्यात आले. तथापि, महानगरपालिकेमार्फत कर्मचा-यांचे वय, त्यांचे अवलंबितांची माहिती व आरोग्य विमा संरक्षण रक्कम (Coverage) ही माहिती पुरविण्यात आल्यास विमा हस्याची अचूक रक्कम निश्चित करण्यात येईल असे नमूद करण्यात आले.

७. महानगरपालिकेमार्फत विमा संरक्षणाची रक्कम निश्चित करण्यात आल्यास त्यावर अतिरिक्त रकमेचे संरक्षण (Floater) विमा कंपनीमार्फत अतिरिक्त माफक शुल्क आकारुन देता येईल असे न्यु इंडिया इंन्शुरन्स कंपनीचे प्रादेशिक व्यवस्थापक यांनी नमूद केले.

८. सदर झालेल्या चर्चेचे अनुषंगाने पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात आलेले आहेत.

अ. विमा कंपन्यांना महागगरपालिकेच्या सर्व कर्मचा-यांचे वय, त्यांचेवरील अवलंबितांची नावे, विमा संरक्षणाकरिता निश्चित करावयाच्या आजारांचा तपशिल व विम्याची रक्कम इ. तपशील उपलब्ध करुन देण्यात यावी

ब. विमा संस्थांकडून महानगरपालिकेच्या कर्मचा-यांकरिता आरोग्य विमा उतरविणेकरिता Expression of Interest मागविण्यात यावे व त्याअनुषगाने अशा सर्व विमा कंपन्यांमार्फत सादरीकरण देणेकरिता बैठकीचे आयोजन करण्यात यावे.

क. धन्वंतरी स्वास्थ्य योजनेच्या विश्वेषण करुन त्याचे सबलीकरणासाठी आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी आवश्यक ते पर्याय सुचवावेत.

ख. धन्वंतरी स्वास्थ्य योजनेमध्ये सहभागी असलेल्या खाजगी रुग्णालयांमध्ये तपासणीकरिता ४ सदस्यांचे (२ वैद्यकीय अधिकारी व २ लेखापरिक्षक विभागातील) एक पथक नियुक्त करण्यात यावे व त्यांचेमार्फत रुग्णालयांतील अभिलेखांची तपासणी करण्यात यावी.

ग. धन्वंतरी स्वास्थ्य योजनेमध्ये रुग्णालयांकडून येणा-या बिलांची पडताळणी दर आठवड्याला करण्यात यावी.

घ. योजनेच्या कामकाजाकरिता आवश्यक असल्यास मानधनावर अतिरिक्त कर्मचा-यांची ३ महिने कालावधीकरिता नियुक्तीबाबत प्रस्ताव सादर करण्यात यावा.

रेखा गाडेकर
प्रशासन अधिकारी
सदस्य

डॉ.मनोज देशमुख
वैद्यकीय अधिक्षक
तथा सदस्य

ॲड. सतिश पवार
प्र.कायदा सल्लागार
सदस्य

मधुकर रणपिसे
सहखजीनदार, कर्मचारी महासंघ
तथा सदस्य

मनोज माछरे
सहखजीनदार, कर्मचारी महासंघ
तथा सदस्य

राजेश आगळे
प्रशासन अधिकारी,
(सहाय्यक आयुक्त, प्रशासन यांचे प्रतिनिधी)

राजेश लांडे
मुख्यलेखापाल
सदस्य

पद्मश्री तळदेकर
मुख्यलेखापरिक्षक
सदस्य

बबनराव झिंझुर्डे
अध्यक्ष, कर्मचारी महासंघ
तथा उपाध्यक्ष

डॉ.के अनिल रॉय
आरोग्य वैद्यकीय अधिकारी
कार्याध्यक्ष

अच्युत हांगे
अति.आयुक्त
तथा उपाध्यक्ष

श्रावण हर्डीकर
आयुक्त
तथा अध्यक्ष